# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/08/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. मौदा :–** फिर्यादी याला दोन मुली असुन मोठी मुलगी वय १५ वर्ष व लहान मुलगी वय १२ वर्ष असे आहेत मोठी मुलगी ही इयत्ता ०९ वी मध्ये शिकत होती ती रोज सायकलने जाणे येणे करते. सकाळी १०/३० वा. शाळेत जाते व सायंकाळी ५/०० वा. घरी परत येते. दि. २८/०८/२०२३ रोजी सकाळी ९.३० वा. दरम्यान फिर्यादी व त्यांची पत्नी मजुरीचे कामाला गेले तेव्हा त्यांची मोठी मुलगी ही घरी हजर होती व नेहमीप्रमाणे सायंकाळी ५.३० वा. दरम्यान घरी परत आले तेव्हा फिर्यादीची मोठी मुलगी हि घरी दिसली नाही तेव्हा फिर्यादीने लहान मुलगी हिला विचारपुस केली व गावामध्ये आजुबाजुला शोध घेतले असता मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. भुते पोस्टे मौदा मो. नं. ९८२२५६६१८० या करीत आहे.

## फसवणुक

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १० कि. मी अंतरावरील मौजा गुमथळा शिवार येथे दिनांक १७/०१/२०१७ ते दिनांक ३०/०८/२०२३ चे १०.३० वा. ते १६.१९ वा. दरम्यान फिर्यादी नामे– रामकृष्ण मानीकराव निंबुळकर, वय ४५ वर्ष, रा. हिंगणा बारभाई, ता. पारशिवनी शेतकरी यांचे नावाने गुमथळा मौदा येथील धान्य गोडावुनला बोगस धान्यसाठा ठेवल्याचे दाखवुन त्यावर कार्पोरेशन बॅंक येथुन फिर्यादी यांचे नावे बोगस लोन केसेस तयार करून **आरोपी नामे– १) श्री रमणराव बोल्ला रा. हनुमान मंदीर कळमना रोड नागपुर २) श्री वाकलपुडी विरव्यंकटराव सत्यनारायण रा. मेनरोड तह. पारशिवनी नागपुर ३) कारपोरेशन बॅंक नागपुर येथील संबंधीत बॅंक अधिकारी वर्ग ४) गोडावुनला अर्जदाराचे नावे बोगस दाखवीणारे कंपनीचे अधिकारी वर्ग** यांनी फिर्यादी यांची लोन रक्कम २,१०,३८,४०७/– रूपयांची फसवणुक करून अपहार केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम १२० ब १०९, ४०९, ४१३, ४२०, ४६७, ४६८, ४७१ भादंवी सहकलम ६६ (ड) माहीती तंत्रज्ञान अधिनियम सहकलम ०३ महाराष्ट्र ठेवीदर अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक निकम आर्थिक गुन्हे शाखा ना ग्रा मो. क्र. ७९७२१४३६८४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०१ कि. मी अंतरावरील मौजा बायपास चौक गिरड रोड उमरेड येथे दिनांक ३०/०८/२०२३ चे ११.४५ वा. ते १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– माणिक घुलबा डडमल, वय ७५ वर्ष, रा. चारबाव घांटोळी ता. भिवापुर हे दिनांक ३०/०८/२०२३ रोजी १०/३० वा. घरून बडोदा बॅंक उमरेड येथे येण्यास निघाले ११/४५ वा. बडोदा बॅंकेतुन २५०००/–रू काढुन फिर्यादी जवळील कापडी थैलीत ठेवले व बॅंकेच्या बाहेर गावाला जाण्यास निघाले पायदळ चालत बायपास चौक पार बस स्टॉप येथे पोहचले. गावाला जाणार कालीपीली टॅक्सीत बसणार तेवढयात पाठीमागुन एक अनोळखी माणुस वय अंदाजे ३० वर्ष अंगात पिवळया रंगाचा टि शर्ट घातलेला मोटारसायकलवर बसुन फिर्यादी जवळ आला. फिर्यादीला त्या अनोळखी माणसाने कार्ड दाखवुन बावाजी आम्ही पोलीस आहो तुमच्या थैलीत काय आहे दाखवा असे म्हणाला असता फिर्यादीने त्या मोटरसायकल स्वार अनोळखी माणसाला जवळची थैली दाखवत असतांना दोघांनी फिर्यादीचे थैलीत हात टाकुन पाहीले व फिर्यादीला थैली परत केली व नजर चुकुन मोटारसायकलने निघुन गेले. फिर्यादीला शंका आल्याने फिर्यादीने थैलीत ठेवलेले पैसे पाहीले असता दिसुन आले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम १७०, ४१९, ४२० भादंवी अन्वये गुन्हा नोंद केला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे मो. क्र. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**